# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ५ जानेवारी, २०२०
वेळ :- सकाळी १०.३० ते दुपारी १.००
**(एकूण गुण १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **गुण २०**

आमच्या बंडूनानांना कुलपांचा मोठा शौक. अनेक धातूंची, अनेक आकारांची, अनेक कळींची कुलपे जमवून त्यांनी एक संग्रहालय बनवले आहे. घरात दूध-दुभत्याच्या कपाटापासून तो तहत पैशाच्या तिजोरीपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्यांनी कुलपे लावून नाकेबंदी करून टाकली आहे. घरावर एखादा डाका पडणार आहे अशी बातमी कळूनही कोणी इतकी तयारी करत नसेल ! बरे, इतका बंदोबस्त करण्याचे कारण विचाराल, तर ते आपल्या चीजवस्तूंचे रक्षण व्हावे ही इच्छा नसून, कुलपांचा संग्रह मित्रमंडळींच्या नजरेस पडावा एवढीच आहे. या हव्यासामुळेच बंडूनानांनी काही कड्यांस दोन-दोन व काही दारांस दोन्ही बाजूंनी कुलपे लावलेली आहेत.

एवढा खटाटोप करून ठेवल्यामुळे बंडूनानांवर अनेक चमत्कारिक प्रसंगही आले आहेत. एकदा त्यांच्या धान्याच्या कोठीच्या कुलपाची किल्ली त्यांच्या कुटुंबाने हरवली. कुलूप जरा निराळ्या पद्धतीचे असल्यामुळे त्याला किल्ली शोधण्याकरता त्यांनी सगळा बाजार पालथा घातला, तरी किल्ली मिळेना ! बरे, कुलूप लोहाराकडून काढावावे तर पोटच्या पोरापेक्षाही ममतेने वाढवलेल्या कुलपाची हाडे खिळखिळी होताना पाहणे हे बंडूनानांसारख्यांना जरा दुर्घटच होते. शिवाय गृहस्थ इतका मानी, की त्यांने शेजाऱ्यांपाशी कधी पसाभर धान्यही उसने मागितले नव्हते. असो, अशा रितीने पहिला दिवस तर घरातील सर्व मंडळीनी त्या कुलपानिमित्त कडकडीत उपास काढला. दुसऱ्या दिवशी द्वादशी ; पण तो दिवसही सगळ्यांनी तितक्याच धार्मिकपणे उपासात काढला. नानांचे तर डोळे पांढरे होण्याची वेळ आली. शेवटी सर्व हकीगत कळताच आम्ही स्वत: लोहारास घेऊन नानांच्या घरी गेलो व ते कुलूप एकदाचे फोडले ; पण त्यामुळे नानांचा आमच्यावर इतका घुस्सा झाला, की पंधरा दिवसापर्यंत, आमच्याशी नीटपणे बोलेनातच !

आपल्या उपयोगातील सर्व किल्ल्या बंडूनाना आपल्या जानव्यात अडकवून ठेवत असल्यामुळे त्या कधी हरवत नाहीत. हरवतात त्या बहुतकरून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यातल्या किल्ल्या. वरील अनर्थ गुदरल्यापासून ते साधी बाजारी कुलपेच ते कुटुंबाच्या स्वाधीन करू लागले. ही कुलपे किल्ल्यांच्याबाबतीत कधीच विधिनिषेध बाळगत नसत. त्यांना कोणतीही किल्ली, खिळा किंवा काडी चालत असे. कधी कधी तर नुसत्या हिसक्यानेच ती उघडत

कृ.मा.प.

असत. त्यांची अशी 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती पाहून शेवटी नानांच्या पदरच्या एका विश्वासू नोकरालाही चोरी करण्याची इच्छा झाली व तो हजारपाचशे डबोले घेऊन पळून गेला. तिजोरीला कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. प्रथम त्यांनी अक्षरी कुलूप लावले ; पण तिजोरी अंधारात असल्यामुळे कुलपाची अक्षरे जमवताना ती नीट दिसेनातच, म्हणून त्यांनी तिजोरी महत्प्रयासाने उजेडात आणून ठेवली. पण तेव्हापासून अक्षरे जुळवताना ती जवळ उभे राहणारासही दिसू लागली. तेव्हा ती कुलपेही कुचकामाची ठरली. यापेक्षा अक्षरशत्रू कुलपे पुष्कळ बरी, असा टोला देत देत त्यांनी त्या कुलपाच्याऐवजी दुसऱ्या कुलपाची योजना केली.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) कुलुपांचा संग्रह करण्यामागे बंडूनानांची कोणती इच्छा होती ?
२) धान्याच्या कोठीच्या कुलुपाची किल्ली हरवल्यामुळे कोणता प्रसंग ओढावला ?
३) बंडूनानांनी आपल्या कुटुंबाकडे बाजारी कुलुपे का दिली ?
४) 'वसुधैव कुटुंबकम्' या वृत्तीचा बंडूनानांना कोणता फटका बसला ?
५) अक्षरी कुलुपे कुचकामी का ठरली ?

**प्रश्न क्र.२ गट 'अ' मधील वाक्प्रचारांची गट 'ब' मधील अर्थाशी समान जुळणी करा.** १०

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) अवसान गळणे | अ) खूप आनंद होणे |
| २) आतुर होणे | आ) नाराज होणे |
| ३) इनाम देणे | इ) संशय येणे |
| ४) उकळ्या फुटणे | ई) प्रेम करणे |
| ५) काबीज करणे | उ) अभ्यास करणे |
| ६) पालवी फुटणे | ऊ) उत्सुक होणे |
| ७) मायेची पाखर घालणे | ए) धीर सुटणे |
| ८) शंका येणे | ऐ) बक्षीस देणे |
| ९) सराव करणे | ओ) हस्तगत करणे |
| १०) हिरमोड होणे | औ) नवीन उत्साह निर्माण होणे |

**प्रश्न क्र.३ खालीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचा वाक्यात उपयोग करा.** १०

| | | |
|---|---|---|
| १) विद्यालय | २) प्रवासी | ३) गोंधळ |
| ४) बक्षीस | ५) प्राणी | ६) पाऊस |

**प्रश्न क्र.४ पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा.** २०

१) शिरीषची भूमिका तुम्हाला कोणता संदेश देते, ते तुमच्या शब्दांत लिहा.
२) रेल्वेचा प्रवास धोक्याचा नाही हे पटविण्यासाठी रेल्वेच्या कारभाऱ्यांनी कोणता आटापिटा केला ?
३) 'काझीरंगा ही कर्दमभूमी आहे' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.
४) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.
५) तुम्हाला समजलेल्या 'सखू आजीचे' व्यक्तिचित्र रेखाटा.
६) बंडूनानांच्या कुलुपांच्या शौकामुळे घडलेला एक प्रसंग सांगा.

**प्रश्न क्र.५ कोणत्याही एका पाठाच्या/कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे ३ ते ४ओळीत लिहा. (कोणतेही चार)** **१०**

अ) 'आभाळातल्या पाऊलवाटा' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) पक्ष्यांच्या दुनियेतील सर्वात स्तिमित करणारी गोष्ट कोणती ?
२) 'युरोपामध्ये अनेक पक्षी हिवाळ्यामध्ये दिसेनासे होतात', या विषयीची जुनी समजूत कोणती आहे ?
३) फक्त ॲल्युमिनिअमचेच वाळे पक्ष्यांच्या पायात का अडकवतात ?
४) पक्षी स्थलांतर का करतात ?
५) हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर का करतात ?

ब) 'उजाड उघडे रानमाळही' या कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) वसंत ऋतूची स्वागत सृष्टीने कसे केले ?
२) जगातील सर्व फुले मनात का झुरू लागली ?
३) 'उजाड उघडे रानमाळही गाऊ लागले वसंतगान' या ओळीतील तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.
४) वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टीत कोणते बदल झाले ?
५) सृष्टीचे सौंदर्य कायम राहण्यासाठी उपाय सुचवा.

**प्रश्न क्र.६ अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा.** **०५**

| | | |
|---|---|---|
| १) Casual leave | २) Lyric | ३) Plumber |
| ४) Secretary | ५) Dismiss | ६) Event |

**ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच संख्या अक्षरात लिहा.** **०५**

| | |
|---|---|
| १) ३५६० | २) २३०+२५=२५५ |
| ३) ५१७—१७=५०० | ४) ३०×९ =२७० |
| ५) ३५÷५=०७ | ६) ३२.५ |

**क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योगय रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा.** **१०**

१) विद्यार्थी माझ्या -------------- नुकताच शिकायला आला आहे. (विद्यालय)

२) मुहुर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन -------------- सुखरूप परत आली. (मुंबई)

३) कोणीतरी इंग्रज कवीने -------------- एक लहानशी कविता केली. (गेंडा)

४) प्रवाशांना या जंगलात फिरवून आणण्यासाठी आसाम --------------पंधरा-वीस हत्ती खास शिकवून तयार ठेवलले आहेत. (सरकार)

५) १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार -------------- वेगवेगळ्या देशांत भरवले जातात. (वर्ष)

६) आफ्रिका आणि आशिया खंडात ------------- असंख्य जातीची लागवड केली जाते. (बांबू)

७) घराभोवतीचा ------------- झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले होते. (दिवे)

८) सखु आजी पंधरा ------------- वाचायला शिकली. (दिवस)

९) एकदा त्यांच्या धान्याच्या कोठीच्या ------------- किल्ली त्यांच्या कुटुंबाने हरवली. (कुलूप)

१०) हिवाळ्यात पक्षी ------------- स्थलांतर करतात. (दक्षिण)

**प्रश्न क्र.७ अ) पुढीलपैकी कोणतेही तीन शब्द शुद्ध करून लिहा.** ०३

१) प्रगति  २) र्अधचंद्र
३) दुष्टी  ४) ऑलींपिक

**ब) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे वचन बदला.** ०३

१) मैदान  २) शाळा
३) घरे  ४) कार्यालय

**क) पुढीलपैकी कोणत्याही तीन शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** ०३

१) उंच  २) सुगंध
३) दु:ख  ४) जन्म

**ड) कंसातील सूचनेप्रमाणे कोणतेही एक वाक्य बदलून लिहा.** ०१

१) आदल्या रात्री खूप पाऊस पडला होता. (काळ ओळखा)
२) रानम्हशींची शिंगे अर्धचंद्राकृती असतात. (विशेषण ओळखा)

-*-*-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**
**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक ५ जानेवारी, २०२०
वेळ :- दुपारी २.१५ ते सायंकाळी ५.००
(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)
**(एकूण गुण १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**प्रश्न क्र.१ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळीत तुमचे विचार मांडा.** **२०**

१) ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम ;
२) शेतकऱ्यांचे प्रश्न आणि उपाययोजना.

**प्रश्न क्र.२ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** **२०**

१) 'अंधश्रद्धा एक सामाजिक समस्या,' या विषयावर चर्चा करा.
२) 'मुलींना सबळ बनविणे ही समाजाची जबाबदारी,' या विषयावर चर्चा करा.

**प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** **३०**

१) राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना नवीन लागू होणाऱ्या ५% वाढीव महागाई भत्त्याबाबत परिपत्रक तयार करा.
२) जिल्हा परिषदांना त्यांच्या क्षेत्रातून येणाऱ्या रोग्यांच्या संख्येच्या आधारावर अंशदाने देण्यासंदर्भात रोग्यांच्या आकडेवारीची माहिती देण्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक तयार करा.
३) अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करा.

**प्रश्न क्र.४ पुढील प्रत्येक गटातून कोणत्याही पाच संज्ञांचे मराठी पर्याय द्या.** **१५**

**'अ' गट**

| | |
|---|---|
| अ) Medical Officer | ब) Collector |
| क) Assistant Commissioner of Labour | ड) Governor of Maharashtra |
| इ) Medical College | फ) Inspector of Police |

कृ.मा.प.

**'ब' गट**

अ) Gazetted Officer
ब) Leave Salary
क) High Court
ड) Auditor
इ) Mother tongue
फ) Reserve Police Force

**'क' गट**

अ) Official Record
ब) Junior Clerk
क) Medical Examination
ड) Anniversary
इ) Category
फ) Registered letter

**प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.** १५

अ) The ground was not prepared.
ब) Go to the market and bring tea, sugar and vegetables.
क) Everyone should keep to the left of the road.
ड) If the younger generation is strong and healthy, the nation will prosper.
इ) Virat Kohali scored a century.
फ) The peon left the office without informing anyone.

-*-*-*-*-*-*-*-*-